# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**2022**

गुन्हे शाखा, नवी मुंबई    दिनांक ०७.११.२०२२

### वाशी पोलीस ठाणे हद्दीमध्ये अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या परदेशी नागरिकाविरूद्ध गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथक व अनैतिक मानवी वाहतुक विरोधी कक्षाने केली कारवाई

---

मा. श्री. बिपिन कुमार सिंह, पोलीस आयुक्त, मा.डॉ.जय जाधव, सह पोलीस आयुक्त, मा.श्री. महेश घुर्ये, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. सुरेश मेंगडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दि. ०४/११/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक विरोधी कक्ष यांना अंमली पदार्थ विक्रीबाबत एक नायजेरियन इसम एमडी हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याबाबत गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली त्या अनुशंगाने मा. श्री. विनायक वस्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि. बासीतअली सय्यद, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे वपोनि. पराग सोनवणे, पोहवा/१३२ मांडोळे, पोहवा/२१०८ चौधरी, चालक पोहवा/९७२ पवार तसेच अंमली पदार्थ कक्षाचे पोहवा/५७८ गायकवाड, पोहवा/१३७७ तायडे, पोशि/२३७८ पवार तसेच चालक पोहवा/४१८६ अहिरे, मोटार वाहन कक्षाचे पोहवा/१००८ बांगर, पोहवा/८४४ जगदाळे तसेच प्रशासन कार्यालयातील पोहवा/४०७० राजपुत, पोशि/१२१६० गागरे यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी आनंद निकेतन सोसायटी समोर, सेक्टर ९ए, वाशी नवी मुंबई येथे छापा टाकला असता नायजेनियन नागरिक नामे किनीची न्वॉनी ओबोंना (KENECHI NWANI OGBONA )वय. ४२ वर्षे, रा. ऑफ्रिकन किंचन, से ११,जुहुगांव, वाशी नवी मुंबई मुळ ओगु रस्ता, इजेबु/आडे, नायजेरीया देश याच्या ताब्यात ‘‘मेथाक्युलॉन’’ हा अंमली पदार्थ विक्री करिता सोबत बाळगलेल्या स्थितीत असताना मिळून आला त्याच्या ताब्यात **एकुण १०,३०,०००/—किमतीचे १३० ग्रॅम मेथाक्युलॉन हस अंमली पदार्थ** तसेच एक स्कुटी नंबर एमएच ०३ बीयु ८१८८, एक नोकीया कंपनीचा मोबाईल असा एकुण १,४०,५००/—रू किंमतीचा माल मिळुन आला.

त्याच्या विरुध्द वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ३३६/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २२(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास वपोनि बासीतअली सय्यद हे करित आहेत.

————————————